सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# आरोग्य विभाग गट क व ड पदभरती २०१६ - दुसरी निवड यादी प्रसिद्ध करणेबाबत

आरोग्य सेवेतील गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवरांची लेखी परीक्षा दिनांक ०८/०१/२०१७ व २२/०१/२०१७ रोजी घेण्यात आली होती. त्या परीक्षेचा निकाल व निवड याद्या आरोग्य विभागाचे संकेतस्थळावर दिनांक १९/०७/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. या निवड यादीतील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करून त्यांना त्यांच्या पसंतीच्या रिक्त जागेवर पदस्थापना देण्याकरीता विभागिय स्तरावर समुपदेशन फेरीचे आयोजन दि.१९.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ या कालावधीत करण्यात आले होते.

सदर समुपदेशन फेरीस गैरहजर राहिलेले, तसेच प्रमाणपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरलेले व नियुक्ती आदेश दिल्यानंतर विहित मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झालेल्या उमेदवारांच्या जागी गुणवत्ता यादीतील पुढील पात्र उमेदवारांची निवड करून त्यांना प्रमाणपत्र पडताळणी व समुपदेशनाकरीता बोलावण्याची बाब संचालनालयाच्या विचारार्थ होती.

संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त अशा रिक्त जागांची संख्या व त्याचे सामाजिक आणि समांतर आरक्षण आणि इतर तरतूदी/नियम विचारात घेवून गुणवत्तेच्या आधारे संवर्गनिहाय दुसरी निवड यादी आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

याकरीता **दिनांक ०८/०२/२०१८ व ०९/०२/२०१८** या कालावधीमध्ये समुपदेशन फेरीचे आयोजन विभागिय कार्यालय स्तरावर करण्यात येत आहे.

सोबत समुपदेशन फेरी कार्यक्रम जोडला आहे. त्यानुसार सर्व उमेदवारांना संबंधित कार्यालयामार्फत सुचित करण्यात येईल. काही कारणास्तव अशी सुचना प्राप्त न झाल्यास त्वरीत विभागिय/संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.

मा. आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई